# वडगाव आनंदमध्ये 'अमृतकुंभ' जलाशयाचे उद्घाटन



**पुणे :** जुन्नर तालुक्यानजीक वडगाव आनंद येथील 'अमृतकुंभ' जलाशयाचे उद्घाटन मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया आणि जिल्हाधिकारी सौरभ राव यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या जलाशयाच्या स्थापनेपूर्वी या परिसरातील तीन गावांची पाण्यासाठी संपूर्ण भिस्त ही टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर होती. फिनोलेक्स पाइप्सने गावकऱ्यांना भेडसावणाऱ्या या समस्येचे गांभीर्य ओळखून मदतीचा निर्णय घेतला. 'अमृतकुंभ' जलाशय भरण्यासाठी कालव्यापासून २.५ किमी अंतरावर जलवाहिनी टाकण्यात आली.